ठाणे, शुक्रवार दि. १७ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : १९, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

लोकसभेचा संग्राम

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

## एकीकडे पांडव सेना, दुसरीकडे कौरव सेना,

# आपल्याला धनुष्य उचलायचंय

**नाशिक : सध्या महाभारताच्या युद्धासारखी स्थिती आहे. एकीकडे पांडव सेना आणि दुसरीकडे कौरव सेना आहे. आपल्याला धनुष्य उचलायचे आहे, अशी तुफान फटकेबाजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आज मनमाड येथे दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या जाहीर सभेतून ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारती पवारांना मोठे मताधिक्य द्या. नांदगाव मतदारसंघाचे जे काही प्रश्न आहे ते सर्व मार्गी लावण्याचे काम मी करेल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीसांनी केले. पश्चिम वाहिन्यांचे पाणी पूर्वेकडे आणायचे आहे. त्यासाठी ६० ते ७० हजार कोटी रुपयांचे नियोजन आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र सर्वांचा पाणी प्रश्न मिटवायचे आहे.** (पान २ वर)



फडणवीसांची नाशिकमधून तुफान फटकेबाजी

### एकीकडे पांडव सेना आणि दुसरीकडे कौरव सेना

सध्या महाभारताच्या युद्धासारखी स्थिती आहे. एकीकडे पांडव सेना आणि दुसरीकडे कौरव सेना आहे. आपल्याला धनुष्य उचलायचे आहे. एकीकडे मोदींची सेना, एकनाथ शिंदेंची सेना, अजित पवारांची सेना, राज ठाकरेंची सेना अनेक संघटना मिळून आपली महायुती तयार आहे. दुसरीकडे राहुल गांधीची २४ पक्षांची खिचडी आहे. राहुल गांधी यांच्याकडे पंतप्रधान पदाचा उमेदवार नाही. संगीत खुर्चीसारखे पंतप्रधान हे २४ पक्ष बदलणार आहे.

**ठाकरे-पवारांवर टीका** – देशाला सुरक्षित ठेवणारा पंतप्रधान निवडायचा आहे. आपल्या विकासाच्या गाडीचे इंजिन मोदी आहे. या गाडीला वेगवेगळे नेते डबे जोडले आहे. सर्वांना घेवून विकासाची गाडी ही पुढे सुरू आहे. दुसरीकडे राहुल गांधी, शरद पवार, मायावती हे सगळेच म्हणतात आम्ही इंजिन आहे. त्यांच्या गाडीला डबेच नाही. सोनिया गांधींच्या इंजिनमध्ये राहुल गांधी, प्रियांका गांधी आहेत. शरद पवार यांच्या इंजिनात सुप्रिया सुळेंसाठी जागा आहे. उद्धव ठाकरे यांच्या इंजिनात आदित्य ठाकरे यांची जागा आहे. सर्वसामान्यांना यांच्या गाडीत जागा नाही.

प्रतिबंधात्मक नोटीसांच्या मुद्द्यावरून

# ठाणे पोलिसांच्या दडपशाहीविरोधात जितेंद्र आव्हाड आक्रमक, केला निषेध

**ठाणे : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून नोटीस बजावण्यात आली असून त्यांना १५ ते १९ मे या कालावधीत विभागातून बाहेर राहण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहे. या नोटीसानंतर राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी या नोटीसांना विरोध केला आहे. पोलिसांनी आवरते घ्यावे अन्यथा ज्या क्षेत्रामध्ये पदाधिकाऱ्यांना नोटीसा बजावल्या जात आहे. ते क्षेत्र बंद करु असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे.**



निवडणूकीमध्ये मतदारांवर प्रभाव पाडला जाऊ शकतो असे सांगत ठाणे पोलिसांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून नोटीस बजावली आहे. या मुद्द्यावरून जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत पोलिसांवर आरोप केले. पदाधिकाऱ्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसतानाही पोलिसांकडून नोटीस पाठविली जात आहे. पोलिसांची वागणूक चुकीची आहे. पोलिसांनी राजकीय गुलाम बनू नये. संविधानाने नागरिकांना कोणत्याही भागात राहण्याचे अधिकार दिले आहेत. पोलिसांनी आवरते घ्यायला हवे अन्यथा आम्ही वेगळे पावले उचलू. ज्या क्षेत्रामध्ये असे प्रकार घडत आहेत. ते क्षेत्र बंद करु असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे.

ठाण्यात मोक्काचे आरोपी पॅरोलवर बाहेर आहेत. हत्या सारखे गंभीर गुन्ह्यातील आरोपी सत्ताधारी पक्षाशी संबंधित असून ते मोकाट फिरत आहेत. त्यांची नावे माझ्याकडे आहेत. ते नागरिकांना दमदाटी करत आहेत. परंतु त्यांच्यावर कारवाई होत नाही. त्यांच्या नावाने नोटीसा काढाव्या असेही आव्हाड म्हणाले. (पान २ वर)

# घाटकोपर दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेला अटक



उदयपूरमधून पोलिसांनी घेतले ताब्यात

मुंबई- घाटकोपर होर्डिंग प्रकरणातील आरोपी भावेश भिंडेला उदयपूरमधून अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी भावेश भिंडेला राजस्थानच्या उदयपूरमधून ताब्यात घेतले. घाटकोपरमधील दुर्घटनेनंतर तो फरार झाला होता. मुंबई पोलीस त्याच्या शोधात होते. अखेर त्याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

दोन दिवसांपूर्वी मुंबईमध्ये अचानक पाऊसाला सुरुवात झाली होती. यावेळी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर पूर्वमधील एक महाकाय होर्डिंग पेट्रोल पंपावर कोसळले. होर्डिंग इतके महाकाय होते की त्याने सर्व पेट्रोल पंपच व्यापला. पेट्रोल पंपाखाली असलेल्या गाड्या, माणसं त्याखाली अडकले. त्यामुळे मोठी जीवितहानी झाली आहे. या अपघातात आतापर्यंत १६ लोकांचा मृत्यू झाला आहे. होर्डिंग ज्या ठिकाणी होते, ती रेल्वेची जागा आहे. मात्र, होर्डिंग अनधिकृत होते. यासाठी मुंबई महानगरपालिकेने रेल्वे पोलिसांना जबाबदार धरलं आहे. सदर घटनेनंतर प्रशासन सक्रीय झालं आहे. मुंबई-पुण्यातील होर्डिंग हटवण्याचे आदेश सहाय्यक आयुक्तांना देण्यात आले आहेत. प्रमुख शहरांमध्ये शेकडोंच्या संख्येने अनधिकृत होर्डिंग असल्याची माहिती मिळत आहेत. त्यांना आता हटवण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५१ वर्षीय भावेश भिंडे याच्यावर होर्डिंग संदर्भात (पान २ वर)

# अखेर घाटकोपरमधील होर्डिंग मृत्यूकांडातील बचावकार्य तब्बल ६३ तासांनी संपल्याचं जाहीर

**पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी घटनास्थाळाची शेवटची पाहणी करत हे बाचवकार्य संपल्याची घोषणा केली.**

मुंबई : घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेचं बचावकार्य अखेर ६३ तासांनी संपल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी घटनास्थाळाची शेवटची पाहणी करत हे बाचवकार्य संपल्याची घोषणा केली. सोमवारी सायंकाळी मुंबईत जो सोसाट्याचा वारा आणि पाऊस आला त्यात, आशियातील सर्वात मोठ होर्डिंग अशी नोंद असलेलं घाटकोपर पूर्व द्रुतगती महामर्गावरील होर्डिंग कोसळलं. आणि कोसळलं ते थेट नजीकच्या पेट्रोल पंपावर. या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला तर ७५ जण जखमी झाले होते. जखमींवर नजीकच्या रूग्णालयांत उपचार सुरू आहेत. जखमी आणि मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारनं आर्थिक मदत जाहीर केली. या दुर्घटनेचं कारण जाणून घेण्यासाठी पालिकेनं व्हिजेटिआयची मदत मागितली. या घटनेची सारी जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असल्याचं सांगत मुंबई महापालिकेनं आधीच यातून अंग काढून घेतलंय. तर ज्या इगो मीडियाकडे या होर्डिंगचं कंत्राट होतं त्याचा मालक भावेश भिंडेचा मुंबई (पान २ वर)



**16** जणांचा मृत्यू

**75** जण जखमी



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## नकली नेत्यांचे प्रताप

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील लोकप्रिय मुत्सद्दी राजा होते. छत्रपती शिवरायांच्या काळात जी रयतेला चांगली वागणूक मिळत होती, त्यापेक्षा आज कितीतरी वाईट पटीने आजचे राज्यकर्ते वागणूक देत आहेत. छत्रपती शिवरायांचा आदर्श प्रत्येकाने बाळगावा; परंतु छत्रपती शिवरायांचे, त्यांच्या पोशाखाचे अनुकरण कोणीही करू नये. याचे कारण म्हणजे जगातील एकमेव रयतेसाठी झटणारा आणि स्त्रियांना आदर्श मानून प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. सद्यस्थितीत राजकारण हीन पातळीवर गेले आहे. कोणीही उपटसुंभ सोम्यागोम्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोशाखाचे अनुकरण करत आहे, जिरेटोप परिधान करत आहे हे खचितच योग्य नव्हे. यामुळे आपली प्रतिमा मोठी होईल असे समजणे म्हणजे गोड गैरसमज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नखाची सर येणार नाही. परंतु असे प्रकार आता वारंवार घडू लागले आहेत. याचे कारण म्हणजे छत्रपती शिवरायांच्या उत्तुंग कार्याची ओळख नसलेले नकली लोक आता छत्रपती शिवरायांच्या पोशाखाचे अनुकरण करू लागले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख नसणारी काही लाचार मंडळी वाढू लागली आहेत. यावर जनतेचा रोख हवाच. त्याशिवाय ही विकृती बंद होणार नाही. ही विकृती आज फैलावत आहे हे दुःखदायक बाब आहे.

पंतप्रधान मोदी यांनी नुकताच वाराणसी येथून उमेदवारी अर्ज भरताना जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी मोदींचे स्वागत करताना त्यांच्या डोक्यावर छत्रपती शिवाजी महाराज परिधान करायचे तशा प्रकारचा जिरेटोप घातला. त्यामुळे देशातील शिवप्रेमी संतापले आहेत. मुद्दा कोणी काय परिधान करावे याचा नाही तर जे आपल्याला पेलणार नाही, ते करण्याचा प्रयत्न कोणी करू नये. या मुद्द्यावरुन टीकेची झोड उठल्यानंतर भाजप आणि शिंदे गटाकडून सारवासारव करण्यात आली. यात मोदींचा दोष नाही, असा न पटणारा बचाव करण्यात आला. असा प्रकार होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. कोणाला मोदींना जिरेटोप घातल्याचा अपमान वाटत असेल तर पुन्हा तसे घडणार नाही. कधी कोणी कोणाला काय घातले? यात मोदीजींचा काय दोष? यावर पूर्ण माहिती घेतल्याशिवाय बोलणे योग्य होणार नाही. याचा तपास केला पाहिजे, असे अकलेचे तारे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तोडले आहेत.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची मानहानी करण्याचे प्रकार आता वाढले आहेत असे दिसते. प्रत्येकाला आपण छत्रपती शिवाजी महाराज असल्याचा भास होऊ लागला आहे. परंतु ते जनतेसाठी योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत, जनतेला सुखी ठेवू शकत नाहीत, अशा नकली लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांचा जिरेटोप परिधान करण्याची गरज पडते हे विशेष आहे. परंतु त्यामुळे आपली प्रतिमा उंचावणार नाही हेही तितकेच खरे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांना शुभेच्छा देताना केलेल्या कृतीने प्रफुल्ल पटेल यांनी वाद ओढावून घेतला आहे. प्रफुल पटेल यांनी तमाम महाराष्ट्रासाठी आराध्य आणि वंदनीय असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेशी घट्ट बांधला गेलेला जिरेटोप मोदींच्या डोक्यावर चढवला. ही छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. तसेच विरोधकांनीही प्रफुल पटेलांच्या या कृतीवरुन टीकेची झोड उठवली आहे.

छत्रपती शिवराय हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे आणि अस्मितेचे प्रतीक आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक गोष्टीबाबत शिवप्रेमी आणि सामान्य नागरिक अत्यंत दक्ष असतात. जिरेटोप हा शिवाजी महाराजांच्या पेहरावाचा भाग होता. त्यामुळे शिवप्रेमींच्या मनात जिरेटोप म्हणजे शिवराय, असे पक्के समीकरण आहे. त्यामुळेच प्रफुल पटेलांनी हा जिरेटोप मोदींच्या डोक्यावर चढवण्याच्या कृतीचे कदापि समर्थन होऊ शकत नाही. जिरेटोप हे हातात देऊन एखाद्या व्यक्तीचा सन्मान केला जातो. परंतु प्रफुल पटेल यांनी महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख असणारा जिरेटोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर परिधान करून महाराजांचा अवमान केला आहे. महायुतीचे नेते दिल्लीच्या तख्तापुढे एवढे लाचार झाले आहेत की, महाराष्ट्राची प्रतिमा डागाळण्याचे काम या नेत्यांकडून होत आहे. महाराजांचा अवमान करणाऱ्या महायुतीला व भाजपला धडा शिकवल्याशिवाय महाराष्ट्राची स्वाभिमानी जनता शांत बसणार नाही, अशी टीका शरद पवार गटाकडून करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप घातला. मोदी काय छत्रपती झाले आहेत का? हा महाराष्ट्राचा अपमान आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आळंदीत आले होते तेव्हाही योगींचा सत्कार करताना त्यांच्या डोक्यावरही जिरेटोप चढवण्यात आला होता. यावरुन प्रचंड वाद झाला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेशी नाळ जोडलेल्या जिरेटोपाविषयी काही संकेत, संहिता आहेत. इतिहास अभ्यासक जयसिंगराव पवार म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख जशी त्यांच्या कार्यातून घडते तशीच त्यांची प्रतिमा त्यांच्या आणि त्यांच्यानंतरच्या छत्रपतींच्या वारसांच्या वापरातील शस्त्र आणि वस्त्रावरूनही ठरते. दि.६ जून १६७४ रोजी शिवराज्याभिषेकाच्या सोहळ्यात या जिरेटोपाला विशेष स्थान होते. छत्रपती शिवाजी महाराज्यांव्यतिरिक्त कोणीही जिरेटोप परिधान करू शकत नाही. इतर सर्व मावळे किंवा सरदार हे पगड्या, फेटे घालत होते. हा अधिकार केवळ छत्रपतींचा होता. इतर कोणीही हा अधिकार गहेऊ शकत नाही, असा ऐतिहासिक संदर्भ आहे. शिंदे, होळकर यांच्यासारख्या बलाढ्य सरदारांनीही कधी जिरेटोप घातलेला नाही. मोदी यांची मर्जी संपादन करण्यासाठी अतिउत्साहाच्या भरात कोणी काहीही करीत आहे. उद्या हे नेते एखाद्या सोम्यागोम्याला राज्यभिषेक करून मोकळे होतील. राजकारणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा वापर होत आहेच, पण आता महाराजांची ओळख आणणारा जिरेटोप परिधान केला जात आहे, हे निषेधार्ह आहे.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

- ☆ मिळकट नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

### मुंबई–पुणे प्रवास करणाऱ्यांसाठी गुड न्यूज !

# अटल सेतू वरून धावणार १५ शिवनेरी बसेस

मुंबई – मुंबई ते पुणे असा प्रवास करणाऱ्यांची संख्या खूपच अधिक आहे. विशेष म्हणजे दरवर्षी सणासुदीच्या दिवसांमध्ये आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये या दोन्ही शहरादरम्यान प्रवास करणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढत असते. यंदा सुद्धा उन्हाळी सुट्ट्या लागल्यापासून या संख्येत वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतोय.

मुंबई ते पुणे दरम्यान धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या बस, खाजगी ट्रॅव्हल्स आणि रेल्वे गाड्या देखील हाउसफुल धावत आहे. अशातच मात्र मुंबई ते पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे.

ती म्हणजे मुंबई ते पुणे दरम्यान अटल सेतू मार्गे धावणाऱ्या शिवनेरी बसची संख्या वाढवण्यात आली आहे. हाती आलेल्या माहितीनुसार अटल सेतू मार्गे धावणाऱ्या शिवनेरी बसची संख्या १५ एवढी करण्यात आली आहे. यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळेल अशी आशा व्यक्त होऊ लागली आहे.

मुंबई ते पुणे दरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी होत असल्याने ही प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला गेला असल्याचे बोलले जात आहे. साहजिकच या निर्णयाचा प्रवाशांना मोठा फायदा होणार असून राजधानी मुंबई ते सांस्कृतिक राजधानी पुणे हा प्रवास सुखकर होणार आहे.

ऐन उन्हाळी सुट्ट्या आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला असल्याने निवडणुकीसाठी आणि उन्हाळी सुट्ट्यांमुळे गावी जाणाऱ्या लोकांसाठी हा निर्णय मोठा फायद्याचा ठरणार आहे.

आम्ही आपणास सांगू इच्छितो की भारतातील सर्वाधिक लांबीच्या सागरी पुलामुळे अर्थातच मुंबई ते नवी मुंबई यांना जोडणाऱ्या अटल सेतू प्रकल्पामुळे बस प्रवासाचा वेळ हा एक तासांनी वाचत आहे.

मुंबई ते पुणे हा प्रवास वाशी मार्गे करण्यासाठी साडेचार तासांचा कालावधी लागतो मात्र अटल सेतूने प्रवास केल्यास हा कालावधी साडेतीन तासांवर आला आहे. यामुळे अटल सेतू मार्गे धावणाऱ्या शिवनेरी बसची संख्या वाढवली गेली पाहिजे अशी मागणी नागरिकांच्या माध्यमातून केली जात होती.

विशेष म्हणजे या मागणीला राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सकारात्मक असा प्रतिसाद दिला असून शिवनेरी बस फेऱ्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. आधी अटल सेतूवरुन शिवनेरी बसच्या फक्त दोन फेऱ्या चालवल्या जात होत्या.

पुणे ते मंत्रालय आणि स्वारगेट ते दादर या दोन शिवनेरी बसच्या फेऱ्या अटल सेतू मार्गे चालवल्या जात होत्या. आता मात्र शिवाजी नगर (पुणे) आणि स्वारगेट विभागाने प्रत्येकी पाच शिवनेरी चालवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवनेरी बसच्या तिकीट दराबाबत बोलायचं झालं तर दादर–शिवाजी नगर या शिवनेरी बसचे तिकीट दर ५३५ एवढे आहे. स्वारगेट–दादर या शिवनेरी बसचे तिकीट दर ५३५ आणि पुणे–मंत्रालय या शिवनेरी बसचे तिकीट दर ५५५ रुपये एवढे करण्यात आले आहे.

## एकीकडे पांडव सेना, दुसरीकडे कौरव सेना, आपल्याला धनुष्य उचलायचंय

(पान १ वरून) **कांदा प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी धोरण राबवविणार –** मोदींनी देशात अनेक योजना राबविल्या आहेत. मोफत रेशन मोदींच्या माध्यमांतून मिळत आहे. मुद्रा लोन मोदींच्या माध्यमातून देण्यात आले. दहा कोटी महिलांना मोदींनी रोजगार मिळवून दिला. मोदींनी अनेक योजना आणल्या आहेत. प्रत्येकाच्या घरावर सोलर लागणार आहेत. ३०० युनिट मोफत तयार होणार आहे. शेतकरी सन्मान निधी, शेतमाल उद्योग प्रक्रिया दिली आहे. कांदा प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी धोरण राबविणार आहे. मनमाड शहरासाठी बायपास मंजुरीसाठी प्रस्ताव द्या, अशी मागणी सुहास कांदेंनी केली. त्यांना मी आश्वासन देतो की, लगेचच बायपास मोदीजींकडून मंजूर करून घेऊ, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**१०० देश म्हणताय की आमचे नेते नरेंद्र मोदी –** विकास करणारे मोदीजी आहेत. भारताला मजबूत करणारे मोदीजी आहेत. कोविड काळात लोक मरत होते, त्यावेळी मोदींनी कोविडची लस तयार करण्यासाठी रॉ मटेरियल दिले. १४० कोटी जनतेला मोदींनी लस उपलब्ध करून दिली. मॉरिशसला गेलो तेव्हा तेथील लोकांनी मोदींचे आभार मानले. जगाच्या पाठीवरील १०० देश म्हणत आहेत की आमचे नेते नरेंद्र मोदी आहेत. देशाला मोदीजींचे सक्षम नेतृत्व मिळाले आहे. आज देश सुरक्षित आहे.

**मोदी बाप बनून बसलेत –** पूर्वी देशात अनेक बॉम्बस्फोट व्हायचे तेव्हा देशाचे पंतप्रधान मूग गिळून बसायचे. तेव्हा लाचारी बाळगून अमेरिकेत जायचे. मात्र मोदींनी सर्जिकल स्ट्राईक केले. त्यानंतर आजतागायत बॉम्बस्फोट झाले नाही. कारण मोदी बाप बनून बसले आहे. आज पाकिस्तान आपल्याला घाबरतोय. देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी भाजपला परिणामी भारताला मतदान करायचे आहे हे लक्षात ठेवा, असे यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## ठाणे पोलिसांच्या दडपशाहीविरोधात जितेंद्र आव्हाड आक्रमक, केला निषेध

(पान १ वरून) ही निवडणूक लोकशाही वाचविण्यासाठी होत आहे. परंतु लोकशाहीची हत्या सुरू आहे. या प्रकाराविषयी निवडणूक आयोगाला तक्रार करण्यात येईल. मतदान प्रचाराच्या दिवसांत पदाधिकाऱ्यांना प्रचार करण्यापासून दूर केले जात आहे, हा अन्याय आम्ही सहन करणार नाही असेही आव्हाड म्हणाले.

## घाटकोपर दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेला अटक

(पान १ वरून) एकूण २६ गुन्हे दाखल आहेत. याशिवाय त्याच्यावर बलात्काराचा गुन्हा देखील दाखल आहे. जेव्हा दुर्घटना घडली तेव्हापासून भिंडे नॉट रिचेबल होता. त्याचे शेवटचे लोकेशन लोणावळा येथे ट्रेस झाले होते. मुंबई पोलीस त्याठिकाणी पोहोचले होते. पण, त्यानंतर तो ऑफलाईन गेला होता. तेव्हापासून पोलीस भिंडेच्या मागावर होते.

## अखेर घाटकोपरमधील होर्डिंग मृत्यूकांडातील बचावकार्य तब्बल ६३ तासांनी संपल्याचं जाहीर

(पान १ वरून) पोलीसांची सात पथक शोध घेतायत. मुंबईतील घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळून सोमवारी मोठी दुर्घटना घडली होती. होर्डिंग दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर होर्डिंगखाली अडकलेल्या ७५ जण जखमी झाले आहेत. ४३ जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहे. घाटकोपरच्या पोलीस मैदानावरील पेट्रोल पंपावर २५० टन वजनाचे बेकायदेशीर जाहिरात होर्डिंग अचानक वादळानंतर कोसळलं. या दुर्घटनेमुळे अनेक जणांचे संसार उघड्यावर पडले आहेत. अनेकांनी आपली मुलं गमावली.

होर्डिंग लावलेली जागा रेल्वे पोलिसांची होती. बेकायदा आणि महाकाय होर्डिंग लावायला रेल्वे पोलिसांनीच परवानगी दिली होती. हे बेकायदा काम करणारा महाभाग म्हणजे लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालीद. सगळे नियम धाब्यावर बसवून या कैसर महाशयांनी इगो मिडीया प्रायव्हेट लिमिटेडला १० वर्षांच्या काळासाठी होर्डिंग लावायला परवानगी दिली होती.

### प्रपत्र सी – १

### फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र

उमेदवाराचे नाव व पत्ता : **नरेश गणपत म्हस्के**
२०७ आनंद नगर, शिवसेना शाखेजवळ, कोपरी, ठाणे
राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४**
मतदारसंघाचे नाव : **२५ – ठाणे लोकसभा**

मी, **नरेश गणपत म्हस्के** वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :-

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | ४७१/२०२०, सीजेएम. कोर्ट, ठाणे | ४७१ / २०२० ३५३, १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ४२७ | सार्वजनिक सेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून रोखण्यासाठी बळाचा वापर, बेकायदेशीर सभा, दंगल इ. |
| २ | ३०१६३७ / २०१५ | आयपीसी 188, मुंबई पोलीस कायदा ३७ (३), १३५ | लोक सेवकाने योग्यरित्या जाहीर केलेल्या आदेशाची अवज्ञा |

| ( ब ) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | निरंक | निरंक | निरंक |
| २ | निरंक | निरंक | निरंक |

नाव व स्वाक्षरी
**नरेश गणपत म्हस्के**

### Format C-1

Declaration about criminal cases
(As per the judgment date 25th September, 2018, of Hou'ble Supreme Court in WP (Civil) No. 365 of 2011 (public Interest Foundation Ors. Vs. Union of india & Anr.)
Name and address of candidate: Mr. SURESH GOPINA TH MHATRE (Balya Mama) ADD: 309, Tejaswi Sadan, Gundawli, Tal-Bhiwandi, Dist Thane 421302
Name of political party: NATIONALIST CONGRESS PARTY - SHARADCHANDRA PAWAR
(Independent Candidates should write Indepeztdent here)

Name of Election: Loksabha General Election-2024

Name of Constituency: 23 BHIWANDI
I Mr. SURESH GOPINATH MHATRE, a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal cases

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Ucts. concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1. Session भिवंडी | 1. Session 345/2016 | 1. निर्दोष - 11/09/2019 | 1. IPC 143,147,148, 149, 323, 326 & 307 Mumbai police Act 37(1), 135, 235(1) |
| 2 | 2. S.S.C. भिवंडी | 2. S.S.C. 2434/2014 | 2. डिस्चार्ज – 22/09/2021 | 2. Mumbai police Act 37(1)(3), 135. |
| 3 | 3. S.S.C. भिवंडी | 3. S.S.C. 1239/2015 | 3. डिस्चार्ज - 26/10/2015 | 3. Mumbai police Act 37(1)(3), 135. |
| 4 | 4. R.C.C. भिवंडी | 4. R.C.C. 61/2010 | 4. निर्दोष–17/09/2010 | 4. IPC 143, 147, 148, 149, 324, 427, Mumbai police Act 135. |
| 5 | 5. S.C.C. भिवंडी | 5. S.C.C. 1344/2009 | 5. निर्दोष - 25/02/2011 | 5. IPC 143, 147, 149 Mumbai police Act 37(3) 135, 36(A), |
| 6 | 6. R.C.C भिवंडी | 6. R.C.C 1412/2008 | 6. निर्दोष - 24/12/2008 | 6. IPC 143, 147, 148, 149, 427, 452, Cr.Pc 248(1). |
| 7 | 7. Session ठाणे | 7. Session 32/2022 | 7. निर्दोष 16/12/2022 | 7. IPC 143,147, 353, 342, 506, 427 Mumbai police Act 37(3), 135. |
| 8 | 8. S.C.C. भिवंडी | 8. S.C.C. 1182/2006 | 8. निर्दोष - 25/02/2011 | 8. IPC 143, Bombay police Act 37(3), 135. |
| 9 | 9. Session ठाणे | 9. Session 371/2006 | 9. निर्दोष 23/03/2007 | 9. Cr.Pc 235(1), IPC 307, 326 r.w.34 |
| 10 | 10. R.C.C. भिवंडी | 10. R.C.C. 1177/2004 | 10. निर्दोष - 29/07/2010 | 10. IPC 143, 147, 148, 149, 323, 320, 504, 506, |
| 11 | 11. R.C.C भिवंडी | 11. R.C.C 880/2003 | 11. निर्दोष -10/07/2009 | 11. CrPc248(1) IPC 143, 147, 148, 149, 324, 323, 336, 337, 504 506. |
| 12 | 12. R.C.C. भिवंडी | 12. R.C.C. 53/2003 | 12. निर्दोष - 20/08/2014 | 12. भारतीय विद्युत कायदा १९९० चे सुधारित १९८६ चे कलम ३९ व ४४ CrPc 248/1). |
| 13 | 13. Session- ठाणे | 13. Session 933/1998 | 13. निर्दोष - 19/12/2000 | 13. IPC 395, 397, 341, 504 r/w 34 Mumbai police Act 37(1), 135. |
| 14 | 14. S.C.C. भिवंडी | 14. S.C.C. 3993/1997 | 14. निर्दोष - 26/08/2010 | 14. IPC 143, 147, 149, 323, 504 CrPc 255 (1) |

(B) Details about Case of conviction for Criminal offences

| Sl.no. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| १. भिवंडी<br>२. भिवंडी<br>३. भिवंडी<br>४. भिवंडी<br>५. भिवंडी<br>६. भिवंडी | 1. Session 345/2016- निर्दोष ११/०९/२०१९<br>2. S.S.C. 2434/2014- डिस्चार्ज २२/०९/२०२१<br>3. S.S.C. 1239/2015 - डिस्चार्ज – २६/१०/२०१५<br>4. R.C.C. 61/2010- निर्दोष १७/०९/२०१०<br>5. S.C.C. 1344/2009- निर्दोष २५/०२/२०११<br>6. R.C.C 1412/2008 निर्दोष २४/१२/२००८ | १. IPC १४३,१४७,१४८, १४९, ३२३, ३२६ ३०७ Mumbai police Act ३७(१), १३५. २३५(१)<br>२. Mumbai police Act ३७(१)(३), १३५.<br>३. Mumbai police Act ३७(१)(३), १३५.<br>४. IPC 143, 147, 148, 149, 324, 427, Mumbai police Act 135.<br>५, IPC 143, 147, 149 Mumbai police Act 37 (3) 135, 36(A).<br>६. IPC 143, 147, 148, 149, 427, 452, Cr.Pc-248(1). | १. निर्दोष ११/०९/२०१९<br>२. डिस्चार्ज २२/०९/२०२१<br>३. डिस्चार्ज – २६/१०/२०१५<br>४. निर्दोष १७/०९/२०१०<br>५. निर्दोष २५/०२/२०११<br>६. निर्दोष २४/१२/२००८ |
| ०७. ठाणे<br>०८. भिवंडी<br>०९. ठाणे<br>१०. भिवंडी<br>११. भिवंडी<br>१२. भिवंडी<br>१३. ठाणे<br>१४. भिवंडी | 7. Session 32/2022 - निर्दोष– १६/१२/२०२२<br>8. S.C.C. 1182/2006–निर्दोष– २५/०२/२०११<br>9. Session 371/2006 - निर्दोष– २३/०३/२००७<br>10. R.C.C. 1177/2004–निर्दोष– २९/०७/२०१०<br>11. R.C.C 880/2003–निर्दोष– १०/०७/२००९<br>12. R.C.C. 53/2003 –निर्दोष– २०/०८/२०१४<br>13. Session 933/1998–निर्दोष– १९/१२/२०००<br>14. S.C.C. 3993/1997–निर्दोष– २६/०८/२०१० | ७. IPC 143,147, 353, 342, 506, 427 Mumbai police Act 37(3), 135.<br>८. IPC 143, Bombay police Act 37(3), 135.<br>९. Cr.Pc 235(1), IPC 307, 326 r.w.34<br>१०. IPC 143, 147, 148, 149, 323, 320, 504, 506.<br>११. CrPc248 (1) IPC 143, 147, 148, 149, 324, 323, 336, 337, 504 506.<br>१२. भारतीय विद्युत कायदा १९९० चे सुधारित १९८६ चे कलम ३९ व ४४ CrPc २४८(१).<br>१३. IPC 395, 397, 341, 504 r/w 34 Mumbai police Act 37(1), 135.<br>१४. IPC 143, 147, 149, 323, 504 CrPc 255 (1) | ०७. निर्दोष – १६/१२/२०२२<br>०८. निर्दोष २५/०२/२०११<br>०९. निर्दोष २३/०३/२००७<br>१०. निर्दोष २९/०७/२०१०<br>११. निर्दोष १०/०७/२००९<br>१२. निर्दोष २०/०८/२०१४<br>१३. निर्दोष १९/१२/२०००<br>१४. निर्दोष २६/०८/२०१० |

In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLASs, mention the election concerned in place of name of constituency.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

# पापडी तलावात पूल, पर्यावरणवाद्यांचा विरोध; पुलाचे सौंदर्य आणि क्षेत्रफळावर परिणाम होण्याची शक्यता

वसई: वसईच्या पापडी येथील पुरातन तलावात भराव टाकून पुल तयार केला जात असल्याने स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे पुलाच्या सौदर्याला बाधा येऊन पुलाचे क्षेत्रफळ कमी होण्याची शक्यता आहे. एकीकडे तलावाचे संवर्धन करणे गरजेचे असताना दुसरीकडे तलावात पूल कशासाठी असा सवाल पर्यावरणवाद्यांनी केला आहे.

वसई पश्चिमेला पापडी येथे पुरातन तलाव आहे. हा तलाव सुमारे दिडशे वर्ष जुना आहे. मुख्य रस्त्याला लागून असलेला हा प्रशस्त तलाव पापडीची ओळख बनला आहे. काही वर्षांपूर्वी पालिकेने या तलावाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेतल्यानंतर तलावाचे क्षेत्रफळ कमी झाले होते. आता पालिकेने तलावाच्या मध्यभागी भराव टाकून पूल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.या तलावाजवळ जुने हनुमान मंदिर आहे. रुस्ता रुंदीकरणात हे मंदिर तलावात स्थलांतरीत केले जाणार असल्याने पूल तयार केला जात आहे. यामुळे स्थानिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तलावातून ये-जा करण्यासाठी आम्ही हा पूल बांधत आहोत. त्यासाठी सध्या माती भराव केला जात आहे. पूलाच्या कामाचे खोदकाम करण्यासाठी हा भराव करण्यात आला आहे. नंतर भराव काढला जाईल, असे पालिकेचे कार्यकारी अभियंता प्रकाश साटम यांनी सांगितले.

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

# मतदारांनो.... मोबाईल ॲप व ऑनलाईन माध्यमातून काढा मतदार चिठ्ठी

**ठाणे : लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख जवळ येत असून ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, यासाठी जिल्हा प्रशासन जोमाने काम करत आहे. मतदारांना मतदान करताना सोईचे जावे, यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तसेच शासकीय कर्मचाऱ्यांमार्फत मतदार चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात येत आहे. त्याचबरोबर मतदारांना त्यांच्या मतदार यादीतील नावांची माहिती व्हावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाने मोबाईल प व ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा लाभ घेऊन मतदारांनी आपली मतदार चिठ्ठी डाऊनलोड करावी आणि आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.**

ठाणे जिल्ह्यात २३ भिवंडी, २४ आणि २५ ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी येत्या २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. ठाणे जिल्ह्याचा मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा स्वीपच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करत आहे. तसेच प्रत्येक लोकसभा मतदारसंघनिहाय असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामार्फत मतदारांना घरोघरी जाऊन मतदार चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात येत आहे.

मतदारांना त्यांच्या मतदान क्रमांक, मतदान केंद्र, मतदार यादीतील भाग व अनुक्रमांक याची माहिती घरबसल्या मिळविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने व्होटर हेल्पलाईन अँप आणि https://voters.eci.gov.in/ व https://electoralsearch.eci.gov.in/ या दोन वेबसाईटवर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून मतदारांना आपल्या मतदार यादीतील नाव व इतर माहिती घेता येईल तसेच मतदार चिठ्ठी सुद्धा डाऊनलोड करता येईल. या मतदार चिठ्ठीची प्रिंट आऊट घेऊन मतदानासाठी जाता येणार आहे. या मतदार चिठ्ठीसोबत भारत निवडणूक आयोगाने मान्य केलेली १२ पैकी एक ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

व्होटर हेल्पलाईन ॲप (Voter Helpline App AVHA) - या पलिकेशन द्वारे नागरिकांना मतदार यादीतील मतदाराचे नाव शोधणे, मतदार नोंदणीचे अर्ज दाखल करणे, मतदान केंद्रांची माहिती इत्यादी सुविधा उपलब्ध आहे.

### खालील पायऱ्या फॉलो करून व्होटर हेल्पलाइन मोबाइल ॲपद्वारे व्होटर स्लिप डाउनलोड करू शकता

पायरी १ : गुगल प्ले स्टोअर (Google Play Store) वरून 'व्होटर हेल्पलाइन ॲप' डाउनलोड करावे.

पायरी २: मतदार सेवा पोर्टल (https://voters.eci.gov.in/) या संकेतस्थळावर नोंदणी केली असल्यास तेथे नोंदणीकृत तुमचा मोबाइल नंबर आणि पासवर्ड टाकून लॉग इन करा किंवा तुम्ही मतदार सेवा वेबसाइटवर नोंदणीकृत नसाल तर 'नवीन वापरकर्ता' म्हणून नोंदणी करा आणि ॲपमध्ये लॉग इन करा.

पायरी ३: 'मतदार यादीत आपले नाव शोधा' या पर्यायावर क्लिक करा.

पायरी ४: पर्यायांपैकी कोणताही एक निवडा - 'मोबाइलद्वारे शोधा', 'बार/क्यूआर कोडद्वारे शोधा', 'तपशीलांनुसार शोधा' किंवा 'EPIC क्रमांकाद्वारे शोधा'.

पायरी ५: आवश्यक माहिती समाविष्ट करा आणि 'शोध' वर क्लिक करा.

पायरी ६: मतदारांचे तपशील दिसेल. त्या ठिकाणच्या 'डाउनलोड' आयकॉनवर क्लिक करा.

वेबपोर्टलवरून ऑनलाईन मतदार चिठ्ठी (व्होटर स्लिप) अशी करा डाउनलोड

भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरूनही आपल्याला मतदार चिठ्ठी डाऊनलोड करता येणार आहे. त्यासाठी खालील प्रमाणे स्टेप फॉलो करा.

पायरी १: भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत https://voters.eci.gov.in/ d https://electoralsearch.eci.gov.in/

### वेबसाइटवर लॉग इन करा

पायरी २ : मुख्यपृष्ठावरील 'मतदार यादीत शोधा' (Search in Electoral Roll) टॅबवर क्लिक करा.

पायरी ३: सोबतच्या पर्यायांपैकी कोणताही एक निवडा - 'तपशीलांनुसार शोधा', 'EPIC द्वारे शोधा' किंवा 'मोबाईलद्वारे शोधा'.

पायरी ४: आवश्यक माहिती आणि कॅप्चा कोड टाका करा आणि 'शोध' वर क्लिक करा.

पायरी ५: समोर तुमचे मतदार विवरण दिसेल. तुम्ही तुमचे तपशील बरोबर आहेत का ते तपासू शकता.

पायरी ६: मतदार तपशीलाच्या खालील बाजूस 'मतदार माहिती छापा' (प्रिंट व्होटर इन्फॉर्मेशन) बटणावर क्लिक करा.

डाऊनलोड झालेली मतदार माहितीची प्रिंट काढून आपल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करता येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने मतदारांना त्यांची नावे ऑनलाइन मतदार यादीमध्ये शोधण्यासाठी सोयी उपलब्ध करून दिले आहेत. या दोन्ही माध्यमातून तुम्ही तुमचा मतदार ओळखपत्र तपशील सहजपणे पाहू शकता. यामध्ये नाव, पत्ता, लोकसभा मतदारसंघाचे नाव, विधानसभा मतदारसंघाचे नाव व क्रमांक, मतदान केंद्राचा पत्ता, मतदार यादीमधील भाग क्रमांक व नाव आणि भाग मतदाता क्रमांक याची माहिती नमूद असते. प्रत्येकाला ऑनलाईन माध्यमातून ही मतदार स्लिप डाउनलोड करता येईल.

ठाणे जिल्ह्यातील सजग मतदारांनी आपले मतदार चिठ्ठी घेऊन येत्या २० मे २०२४ रोजी मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

# उमेदवार निलेश सांबरे यांच्या भव्य प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**भिवंडी : भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तथा जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे यांच्या प्रचारासाठी आज (गुरुवारी) जिजाऊ संघटनेच्या वतीने वाडा शहरातील विविध भागातून भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीला मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. रॅलीमध्ये उमेदवार सांबरे यांच्या आई भावनादेवी सांबरे याही सहभागी झाल्या होत्या.**





जिजाऊ संघटनेने सांबरे यांच्या प्रचारासाठी संपूर्ण मतदारसंघातील सहाही विधानसभा क्षेत्रातून सात दिवसांची विजय निर्धार यात्रा नुकतीच काढली होती. या विजय निर्धार यात्रेला मतदारसंघातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. आज वाडा शहरांतूनही निलेश सांबरे यांच्या प्रचारासाठी जिजाऊ संघटनेने प्रचार रॅली काढत अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या शिलाई मशीन या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. रॅलीमध्ये सांबरे यांच्या आई भावनादेवी सांबरे याही सहभागी झाल्या होत्या.

सदर रॅलीची सुरुवात वाडा खंडेश्वरी नाक्यापासून झाली. शिवाजीनगर, शास्त्रीनगर, गणेशनगर, ऐशीत रोड, अशोक भवन, सिद्धार्थनगर, परळी नाका, नेहरूनगर, संजय गांधी नगर, मंगलनगर, पीक कॉलनी, पाटील आळी अशा वाड्यातील सर्व भागातून ही प्रचार रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीत वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यातही महिलांचा सहभाग लक्षणीय होता. प्रचार रॅलीचे ठिकठिकाणी नागरिकांनी फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोषात स्वागत केले. मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी करीत सांबरे यांना आपला पाठींबा व्यक्त करीत होते. यावेळी जिजाऊ संघटनेच्या कार्यकर्त्यांनी प्रचारपत्रक वाटत निलेश सांबरे यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला सक्षमीकरण, शेतीसंदर्भात केलेली कामे त्यांना पटवून देत सांबरे यांच्यासारख्या योग्य उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले.

# शनिवारी कामोठेत 'मा. श्री. परेश ठाकूर केसरी'

## भव्य कुस्त्यांचे जंगी सामने



पनवेल : पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते डॅशिंग युवा नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार दिनांक १८ मे रोजी कामोठे येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मा. श्री. परेश ठाकूर केसरी पनवेल २०२४' या भव्य कुस्त्यांचे जंगी सामने आयोजित करण्यात आले आहेत. शनिवारी सायंकाळी ०४ वाजता सेक्टर ११ मधील नालंदा बुद्धविहाराच्या बाजूला असलेल्या मैदानावर हे जंगी सामने होणार आहेत. यावेळी विशेष आकर्षण म्हणून नेपाळ येथील पै. देवा थापा आणि हिमाचल प्रदेश येथील पै. नविन चौहान यांची बिग शो मॅच होणार आहे. तसेच सामने महिला आणि पुरुष या प्रकारात आणि विविध गटात होणार असून विजेत्यांना एकूण ०५ लाख रुपयांच्या रोख रक्कमेचे पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. कुस्ती हा खेळ आपल्या भारतात प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. प्राचीन काळी जत्रा, मेळावे यांचे आयोजन असताना गावोगावी कुस्त्या भरवल्या जात असत. मैदानी आणि मर्दानी असलेल्या या मातीतल्या खेळाला जागतिक स्तरावरही मानसन्मान आहे आणि आपली कुस्ती ऑलिम्पिकमध्येही खेळली जात आहे. त्यामुळे कुस्तीचे आकर्षण मोठ्या प्रमाणात आहे आणि त्याप्रमाणे हे कुस्ती सामने भव्य होण्यासाठी कामोठेतील मैदान आकर्षकपणे सजत आहे.

# सुक्या मासळीच्या दरात वाढ, कोळंबीचे सोडे १३०० रुपये

उरण : पावसाळ्यात मासेमारीवर बंदी असल्याने या काळात सुक्या मासळीवर अवलंबून राहावे लागते. मात्र आवक घटल्याने सुक्या मासळीचे दर वाढू लागले आहेत. या वर्षी कोळंबीच्या सोड्याचे दर हे किलोला १ हजार ३०० रुपयांवर पोहोचले आहेत. महिनाभरावर पावसाळा आला असून सुक्या मासळीच्या मागणीत वाढ झाली आहे. यामध्ये सर्वसामान्यांचे अन्न असलेले बोंबील आणि करंदीचे दर गगनाला भिडले आहेत. हे दर किलोला ६०० रुपयांवर पोहोचले आहेत. मात्र तरीही किनारपट्टीवरील रहिवासी खिशाला चाट देत सुकी मासळी खरेदी करीत आहेत.

सागरी किनारपट्टीवर खोल समुद्रातील, खाडीतील ताजी आणि यातीलच निवडक सुकविलेली मासळी मिळते. यातील सुकी मासळी ही पावसाळ्यात मासळीचे प्रमाण कमी असते. त्यामुळे हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात सुकविलेल्या मासळीचा वापर केला जातो. परंतु समुद्रातील मासळीचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शिल्लक आणि लहान आकाराची मासळी सुकविली जाते. त्याचेही प्रमाण कमी झाले आहे. त्याचप्रमाणे ही मासळी सुकविण्यासाठी लागणारी जागा ही उपलब्ध नसल्याने मच्छीमारांना मासळी सुकविणे कठीण झाले आहे. परिणामी सुक्या मासळीचे प्रमाण कमी झाले आहे. या वाढत्या अडचणीमुळे सुक्या मासळीचाही दुष्काळ निर्माण झाला आहे.



# संध्याकाळपासून पहाटे ५ पर्यंत धडक कारवाई करीत नमुंमपा अतिक्रमण विभागाने हटवले १५ अनधिकृत होर्डींग

नवी मुंबई : १३ मे रोजी सायं. ४ नंतर आकस्मिक वादळ व पावसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने तसेच या कालावधीत मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून झालेली दुर्घटना लक्षात घेत राज्य शासनाच्या आदेशाच्या पार्शवभूमीवर नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी १४ मे रोजी दूरदृश्य प्रणालीव्दारे तातडीने बैठक घेतली.

या बैठकीत आयुक्तांनी नमुंमपा क्षेत्रात ठिकठिकाणच्या होर्डिंग स्वरुपातील जाहिरात फलकांचे संरचनात्मक परीक्षण करण्याच्या यापूर्वीच ३० एप्रिल रोजी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी झाली असल्याची खातरजमा करून घ्यावी आणि अनधिकृत होर्डींग हटविण्याची कार्यवाही सुरू करावी असे स्पष्ट निर्देश दिले होते. त्याचप्रमाणेसिडको, एमआयडीसी, रेल्वे, सायन पनवेल महामार्ग अशा ठिकाणी असलेल्या होर्डींगबाबतही संरचनात्मक परीक्षण करून घेणेबाबत सूचित केले होते.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागाने लगेचच तत्पर कार्यवाही सुरू करून परवाना विभागाकडून परवानाधारक होर्डींगची माहिती प्राप्त करून घेत अनधिकृत होर्डींग हटविण्याच्या कार्यवाहीला तत्परतेने सुरूवात केली.


अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच विभागांमध्ये तेथील विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त यांचे समक्ष तोडक कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली. १५ एप्रिल रोजी सायं. ५ वाजल्यापासून १६ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत अनधिकृत होर्डींग विरोधातील धडक कारवाईत आकाराने मोठे होर्डींग स्वरूपातील १५ अनधिकृत जाहिरात फलक अविश्रांत काम करून हटविण्यात आले.


यामध्ये बेलापूर स्टेशन लगत तसेच बेलापूर अग्निशमन केंद्राच्या बाजूला सार्वजनिक शौचालयाच्या जवळ पदपथावर असलेल्या अशा २ ठिकाणच्या मोठ्या होर्डींग निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे सेक्टर १ शिरवणे येथे प्लॉट क्र. ४३ वर असलेले ३ मोठे अनधिकृत होर्डींगही हटविण्यात आले.

वाशीगाव मधील कृष्णा रेस्टॉरंट जवळ विनापरवानगी उभारण्यात आलेले २ मोठे होर्डींग तसेच तुर्भे विभागात सानपाडा स्टेशनच्या पूर्व भागात असलेल्या ४ अनधिकृत होर्डींगवर तोडक कारवाई करण्यात आली. घणसोली विभागात एमआयडीसी भागात गवळीदेव स्थळाच्या पुढे सेंट्रल रोडवर असलेली दिशादर्शक कमानीची लोखंडी फ्रेम होर्डींग काढण्यात आले.

ऐरोली विभागात सेक्टर ३ बसडेपो मधील १ अनधिकृत होर्डींग तसेच दिघा येथे हॉटेल मुंबई एक्सप्रेसच्या समोरील २ मोठे अनधिकृत होर्डींग निष्कासित करण्यात आले.

अशाप्रकारे नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागामार्फत काल संध्याकाळपासून पहाटे ५ वाजेपर्यंत अनधिकृत होर्डींग हटविण्याची धडक कारवाई सुरू करण्यात आली असून आजही ठाणे बेलापूर रोडवर कोपरखैरणे विभागात अनधिकृत मोठे होर्डींग हटविण्याची कार्यवाही सुरू आहे. यापुढील काळात ही कारवाई अशीच तीव्रतेने सुरू राहणार असून नवी मुंबईत कोणतीही दुर्घटना घडू नये याकरिता महानगरपालिका दक्ष असल्याचे अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांनी स्पष्ट केले आहे.





अपक्ष उमेदवार म्हणून सर्वाधिक मताधिक्याने मंत्र्याला पाडून निवडून येणार निलेश सांबरे यांचा दावा


# बाळ्या मामा हेच कपिल पाटील यांची 'बी' टीम : निलेश सांबरे

## मतदारांचा मला प्रचंड प्रतिसाद; बिथरल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली – निलेश सांबरे

भिवंडी : राष्ट्रवादीचे उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा हे भाजपच्या कपिल पाटील यांची 'बी' टीम असल्याचा खळबळजनक आरोप जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष तथा भिवंडी लोकसभेतील अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी येथे भिवंडी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केला आहे. शरद पवारांच्या काँग्रेस संपवण्याच्या प्रयत्नांचाच हा भाग असून पवारांनी काँग्रेस संपवण्याची सुपारी घेतल्याचे जगजाहीर आहे अशी घणाघाती टीकाही यावेळी सांबरे यांनी केली. सुरुवातीपासून मी काँग्रेसी विचारधारेत वाढलो आहे, काँग्रेसचा कार्यकर्ता आहे. २०१३ पर्यंत मी जिल्हा जनरल सेक्रेटरी होतो. आजही काँग्रेसचा सदस्य आहे, त्यामुळेच काँग्रेसकडून उमेदवारी मिळण्यासाठी मी प्रयत्न केले. मला मिळणारा मतदारांचा प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. बिथरल्याने ते माझ्यावर खोटे आरोप करीत आहेत, असेही निलेश सांबरे यांनी स्पष्ट केले. तर अपक्ष उमेदवार म्हणून सर्वाधिक मताधिक्याने मंत्र्याला पाडून निवडून येणार असल्याचा दावा निलेश सांबरे यांनी केला आहे.

सांबरे पुढे म्हणाले की, 'निवडणुकीच्या पंधरा दिवस अगोदरपर्यंत बाळ्या मामा कोणाकडे होते तर शिवसेना शिंदे गटाकडे होते. ते तर भाजपची म्हणजेच कपिल पाटलांची 'बी' टीम आहेत. दुसरीकडे काँग्रेसचा भिवंडी लोकसभा मतदारसंघ काही कारण नसताना राष्ट्रवादीकडे घेऊन येथून काँग्रेस संपवण्याचं काम शरद पवारांनी केले आहे.' मी मुळचा काँग्रेसी विचारांचा कार्यकर्ता आहे, आजही काँग्रेसचा सदस्य असल्याने मी काँग्रेस या एकाच पक्षाकडे लोकसभा निवडणुकीचे तिकीट मागितले होते. भिवंडीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी या निवडणुकीला उभा आहे, मला खासदार होण्यासाठी मी निवडणूक लढवत नाही तर, इथल्या प्रत्येक मतदाराला खासदारासारख्या सुविधा मिळाव्यात– ज्या सुविधा कपिल पाटलांना मिळताहेत, त्या जनतेलाही मिळाव्यात यासाठी मी निवडणूक लढवत असल्याचे निलेश सांबरे यांनी स्पष्ट केले.

'जे लोक आपल्या तालुक्याचे होत नाहीत, समाजाचे होत नाहीत, गावाचे होत नाहीत पाटील यांनी केंद्रीय मंत्री झाल्यानंतर भिवंडी शहरासाठी, तालुक्यासाठी केंद्रीय विद्यालय आणले का, रेल्वेच्या समस्या सोडवल्या का? भिवंडीतील समस्या जितेंद्र आव्हाड इथे येऊन नाही सोडवणार. त्यांनी मुस्लिम मतांचा फक्त वापर केला', अशी टीका निलेश सांबरे यांनी यावेळी केली. आपल्याला असंख्य लहानमोठे राजकीय पक्ष– संघटनाचा पाठींबा मिळत असून भिवंडी लोकसभेच्या एका राजकीय पक्षाच्या उमेदवारासह ४ अपक्ष उमेदवारांनी आपल्याला पाठींबा दिल्याचे सांबरे यांनी याप्रसंगी आवर्जून सांगितले. तर जिंकून आल्यानंतर कुठल्याही पक्षात जाण्याचा सबंध नाही कारण मी मुळातच कांग्रेस विचारधारेचा आहे असे सांगत भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे.



# पनवेलमध्ये बेकायदा फलकांचे तोडकाम दोन दिवसात

पनवेल : बेकायदा फलकांचे तोडकाम पनवेल महापालिका प्रशासन दोन दिवसांत हाती घेणार आहे अशी माहिती पनवेल महापालिकेच्या बांधकाम नियंत्रण पथकाचे प्रमुखांनी गुरुवारी दिली. पनवेल महापालिका हद्दीत शेकडो फलक पालिकेतील विविध रस्त्यांशेजारी आहेत. मात्र यामधील पालिकेच्या परवाना विभागाकडून रितसर परवानगी घेऊन ८७ विविध फलक उभारले आहेत. या व्यतिरिक्त पालिकेची परवानगी न घेता उभारलेल्या फलकांचे सर्वेक्षण पालिकेने गुरुवारीपासून करण्याचे आदेश पालिकेच्या अतिक्रमन विभागाने पालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले. पालिकेचे उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनूसार पनवेल महापालिकेच्या चार विविध प्रभाग अधिकाऱ्यांची गुरुवारी बैठक घेऊन मुंबई येथील फलक दुर्घटनेनंतर सतर्कतेसाठी पनवेलमध्ये किती फलक उभारले आहेत त्याचे तातडीने सर्वेक्षण करण्याची सूचना पालिकेने प्रभाग अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

या सर्वेक्षणानंतर फलकाची परवानगी न घेतलेल्या फलकाचे तातडीने तोडकाम पालिका हाती घेणार असल्याचे उपायुक्त गायकवाड म्हणाले. उपायुक्त गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनूसार पुढील दोन दिवसांत बेकायदा फलकांचे तोडकाम पालिका हाती घेणार आहे.

# महिला स्वच्छताकर्मींनी केला मतदानाचा निर्धार व इतरांनाही केले मतदानाचे आवाहन



नवी मुंबई : २५ ठाणे लोकसभा निवडणूकीचे मतदान सोमवारी २० मे रोजी असून त्यामध्ये प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावणेबाबत स्वीप कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

यामध्ये विविध घटकांना सामावून घेतले जात असून जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महिला स्वच्छताकर्मींच्या आरोग्य तपासणी शिबिराप्रसंगी उपस्थित शंभरहून अधिक स्वच्छतासखींना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी मतदानाचे महत्व सांगितले. तसेच प्रत्येक स्वच्छतासखींनी आपला मतदानाचा हक्क बजावावा तसेच कुटुंबियांनाही बजाविण्यास सांगावे असे आवाहन करण्यात आले.

याप्रसंगी सर्व स्वच्छतासखींनी ज्या डाव्या हाताच्या बोटावर मतदान केल्याची खूण अर्थात शाई लावण्यात येणार आहे ती तर्जनी उंचावून मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला व आमच्यासारखाच सर्वांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा असे प्रतिकात्मक आवाहन केले.

# अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करा

## आयुक्त अजय वैद्य यांचे आदेश

भिवंडी : १३ मे २०२४ रोजी सायंकाळी आलेल्या आकस्मिक वादळामुळे व अतिपर्जन्यवृष्टीमुळे भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात उद्भवलेली आपत्तीजनक परिस्थिती तसेच मुंबईतील घाटकोपर येथे मोठे होर्डिंग्ज कोसळल्याची घडलेली दुर्घटना याचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाकडून आलेल्या निर्देशानुसार भिवंडी महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी १६ मे २०२४ रोजी तातडीने सर्व प्रभाग अधिकारी, शहर विकास अधिकारी, परवाना विभाग प्रमुख यांची बैठक घेण्यात आली, या बैठकीला पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय व अतिक्रमण नयना ससाणे, नगर रचनाकार अनिल येलमाने अन्य अन्य अधिकारी उपस्थित होते.

अचानक आलेल्या वादळामुळे व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे शहरातील परिस्थिती जाणून घेतली तसेच वादळी वारे व अतिवृष्टी प्रसंग लक्षात घेऊन आपत्ती सांगून येत नाही त्यामुळे आपत्कालीन विभागाने २४ तास सतर्क राहण्याचे निर्देश दिले.

घाटकोपर येथे आकस्मिकपणे उद्भवलेल्या आपत्तीजनक परिस्थितीचा विचार करुन पूर्व खबरदारी घेत आयुक्त अजय वैद्य यांनी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, आयुक्त नयना ससाने, अ.रा. येलमाने सहाय्यक संचालक नगररचनाकार तसेच सर्व प्रभाग अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांच्याशी संवाद साधत



विभाग निहाय परिस्थितीचा आढावा घेतला आणि महत्त्वाच्या सूचना केल्या.

घाटकोपर येथे होर्डिंग्ज कोसळण्याची घडलेली दुर्घटना लक्षात घेत भिवंडी महापालिका क्षेत्रातील अंतर्गत भागात तसेच शहरातील मुख्य मार्ग, रेल्वे हद्द, एमआयडीसी भागात लावण्यात आलेल्या मोठे होर्डिंग स्वरुपातील आकाश चिन्ह जाहिरात फलकांचे रचनात्मक परीक्षण करण्याच्या यापूर्वीच दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी झाली असल्याची खातरजमा करून घ्यावी, अशा स्पष्ट सूचना आयुक्तांनी दिल्या.

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या एकूण होर्डिंग्सची संख्या, त्यांचे आकारमान, त्यामधील परवानगी दिलेल्या याची संख्या, याची माहिती त्वरीत संकलित करुन अहवाल सादर करावा, तसेच अनधिकृत पणे लावण्यात आलेल्या होर्डिंग्ज यावर कारवाई करणे त्याचप्रमाणे अवैध, अनधिकृत जाहिरात फलक निष्कासनाची कार्यवाही करण्याचे आयुक्तांमार्फत आदेश देण्यात आले.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील

# मतदान प्रक्रियेसाठी यंत्रणा सज्ज : सुषमा सातपुते

**ठाणे (गणेश भोईटे) : येत्या २० मे २०२४ रोजी संपन्न होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी २४–कल्याण लोकसभा मतदार संघाची मतदान प्रक्रियेची यंत्रणा सज्ज असून, जास्तीत जास्त लोकांनी मतदान करुन मतदाराचा आपला हक्क बजवावा, असे आवाहन २४–कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी केले.**

२४–कल्याण लोकसभा मतदार संघातील एकूण ६ विधानसभा मतदार संघात १९६० मतदान केंद्रे असून १० पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी तसेच जास्त घनता असलेल्या ठिकाणी म्हणजे एकूण १०१२ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही व वेब कास्टींगची सुविधा पुरविण्यात आली आहे. सद्यास्थितीतील तीव्र उन्हाळा लक्षात घेता प्रत्येक मतदान केंद्रावर १ मेडिकल कीट तसेच किमान आवश्यक सुविधांची (पिण्याचे पाणी, रॅम्प, शौचालय इ.) व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक मतदानाचे ठिकाणी आरोग्य सेविका/आशा सेविकांची नेमणूक करण्यात येत आहे.

मतदारांना मतदार यादीतील नोंदीबाबतच्या तपशिलाच्या मतदार स्लिप वाटण्याचे काम पूर्ण झाले आहे. निवडणूकीकामी मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. अंध दिव्यांग मतदारांना सर्व मतदान केंद्रांवर रॅम्प, व्हिलचेअरची व्यवस्था करण्यात आली असून, सक्षम प्रणालीद्वारे विनंती करण्यात आलेल्या दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर ने–आण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिव्यांगाना रांगेत उभे न राहता मतदान करता येणार आहे. तसेच अंध दिव्यांग मतदारांना ब्रेल लिपीतील मतपत्रिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सर्व मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्र तळ मजल्यावर घेण्यात आले असल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी नमूद केले.

सद्यास्थितीपर्यंत आचारसंहिता भंगाच्या तक्रारी संदर्भात ५ FIR नोंदविण्यात आले आहेत. १४९ कळवा–मुंब्रा विधानसभा मतदार संघातील २१६ मतदान केंद्रात पर्दानशीन महिला मतदार असल्यामुळे या प्रत्येक केंद्रात महिला मतदार कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. आता पर्यंत C Vigil ॲपवर ३१८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, सदर तक्रारींचे निवारण या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदार संघांनी विहीत वेळेत केलेले आहे.

उत्सव..




*२५ ठाणे लोकसभा मतदारसंघ ओवळा–माजिवडा विधानसभा मतदारसंघात 'मी नक्की मतदान करणार' अंतर्गत मतदानाबाबत जनजागृती करताना कर्मचारी.*

# आदिवासींना मानसन्मान देणाऱ्या उमेदवारालाच मत द्या

## आदिवासी क्रांती सेनेचे आवाहन

ठाणे : पाचव्या टप्प्यातील मतदान येत्या २० मे रोजी होत आहे. या मतदानामध्ये मुरबाड, शहापूर, भिवंडी, वाडा, कल्याण पूर्व आणि पश्चिम तसेच डोंबिवलीच्या ग्रामीण भागात आदिवासींची मतसंख्या मोठी आहे. मात्र, अनेक उमेदवारांकडून आदिवासी समाजाला विश्वासात घेतलेले नाही. त्यामुळे सर्व आदिवासी बांधवांनी मानसन्मान देणाऱ्या उमेदवारालाच मत द्यावे; अन्यथा, बहिष्कार घालावा, असे आवाहन आदिवासी क्रांती सेनेचे अध्यक्ष अनिल भांगले यांनी केले आहे.

अनिल भांगले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये म्हटले आहे की, मुरबाड, शहापूर, भिवंडी, वाडा, कल्याण पूर्व आणि पश्चिम तसेच डोंबिवलीच्या ग्रामीण पट्ट्यात आदिवासींची मोठी संख्या आहे. या भागातील आदिवासींच्या जमिनींवर धनदांडग्यांनी कब्जा केला आहे. कल्याण, मुरबाड, मलंगगड परिसर, शहापूर, भिवंडी भागातील अनेक वाड्या वस्त्यांवर मूलभूत सुविधा पोहचविण्यात शासनाला यश आलेले नाही. पाणी, आरोग्य, शिक्षण आदी सुविधा आदिवासींना मिळत नाहीत. याबाबत अनेक उमेदवारांनी आपल्या जाहीरनाम्यात उल्लेखही केलेला नाही. आदिवासी वाड्या वस्त्यांवर उमेदवार जाण्यास तयार नाहीत. म्हणजेच, आदिवासींचा विकास करण्याबाबत कोणतेही धोरण आखले जात नाही. एकूणच अनेकांनी आदिवासींना गृहीत धरले आहे. त्यामुळेच आता जे उमेदवार आदिवासी समाजाला मानसन्मान देतील, अशाच उमेदवारांना मत द्यावे. अन्यथा, बहिष्कार घालावा, असे आवाहन अनिल भांगले यांनी केले.

## २६ मे ते ३१ ऑगस्ट रोजी समुद्रात जाण्यास प्रतिबंध

ठाणे : पावसाळी हंगामात दि. २६ मे ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत नोंदणीकृत जलयानाना समुद्रात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य बंदर अधिकारी कॅ. प्रविण खरा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.सुरक्षिततेच्या कारणास्तव पावसाळी हंगामात दरवर्षी महाराष्ट्र सागरी मंडळाच्या सर्व बंदरांमधून जलयानांना समुद्रात जाण्यापासून बंदी घालण्यात येते. यावर्षीही दि. २६ मे ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत कोणतीही जलयाने समुद्रात घेऊन जाऊ नयेत, असे आवाहन खरा यांनी केले आहे. यासंदर्भात मंडळाच्या अखत्यारीतील सर्व बंदर कार्यालयांना कळविण्यात आले असल्याचेही त्यांनी कळविले आहे.

# कोरम मॉलमध्ये ठाणे पालिकेची मतदार जागृती

ठाणे (मेधा भोईटे) : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ठाणे जिल्ह्यात सोमवार, २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी बुधवारी कोरम मॉल येथे पीडीसी इव्हेंट्स या ग्रुपने फ्लॅशमॉबद्वारे जागृती केली आणि मतदान करण्याबद्दल आवाहन केले. याआधी असा फ्लॅशमॉब गेल्या आठवड्यात विवियाना मॉलमध्ये करण्यात आला होता.



महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ठाणे महापालिकेतर्फे मतदार जागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याच मालिकेत, सुटीच्या काळात नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या कोरम मॉलमध्ये मतदार जागृती करण्याची जबाबदारी युवावर्गाने घेतली होती. आम्ही मतदान करणार आहोत, आपणही न विसरता हे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करावे, असे आवाहन या युवांनी नागरिकांना केले. तसेच, फ्लॅशमॉबद्वारे नृत्यातून रसिकांची मनेही जिंकली.

जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभागी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत मतदार जागृतीकरिता विविध उपक्रम राबविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेनेही जाहिराती, बॅनर्स, सोशल मिडिया, आशा सेविका तसेच महापालिकेच्या विविध उपक्रमांतर्गत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेने मतदान यंत्रांची प्रतिकृती असलेला मॅस्कॉटही तयार केलेला आहे. त्याचबरोबर, मिनी मॅरेथॉनच्या माध्यमातूनही मतदानविषयी जागृती करण्यात आली.

राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त

# डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती उपक्रम

**नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना व स्थलांतरित लोकसंख्या यामुळे हे क्षेत्र हिवताप व डेंग्यू या आजारांसाठी संवेदनशील आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षण तसेच साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळी नाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण तसेच राबविण्यात येणाऱ्या जनजागृती मोहीमा यांच्या माध्यमातून प्राधान्याने हिवताप व डेंग्यू आजारांचा प्रसार रोखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**


या अनुषंगाने १६ मे २०२४ रोजीच्या राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात १६ मे रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे यावर्षीचे घोषवाक्य 'समुदायाच्या संपर्कात रहा, डेंग्यूला नियंत्रित करा' जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार डेंग्यूविषयी प्रतिबंधात्मकउपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी जनतेचा सक्रिय सहभाग घेऊन डेंग्यू आजारास प्रतिबंध करणे हे राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याबाबत विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.

यामध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डेंग्यू प्रतिबंधात्मक तसेच जनजागृतीपर वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये राष्ट्रीय डेंग्यू दिनी अर्थात १६ मे रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रात मोठी बांधकामे वा झोपडपट्टी अशा एकूण ३८ ठिकाणी डेंग्यू जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे, १६ ते २१ मे २०२४ या कालावधीत प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये, खाजगी वैद्यकिय व्यावसायिक व खाजगी प्रयोगशाळा प्रमुख यांची प्रत्यक्ष सभा घेऊन त्यांना हिवताप, डेंग्यू, साथरोग, जलजन्यरोग याबाबत संबोधित करण्यात येणार आहे.

याच १६ ते २१ मे कालावधीत डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कामगारांच्या सभा घेऊन फवारणी काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दि. २१ मे २०२४ रोजी मुख्यालयातील आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक यांच्या



सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

डेंग्यू हा विषाणुजन्य आजार असून, डेंग्यू विषाणू संक्रमित एडिस इजिप्ती या डासाची मादी चावल्यामुळे तो प्रसारित होतो. हा एडिस इजिप्ती डास गच्चीवरील व घराच्या परिसरातील पाण्याच्या साठ्यात तसेच भंगार साहित्य, टायर्स, रिकाम्या बाटल्या, करवंट्या, रंगाचे डबे, पाण्याच्या बाटल्या, घरावर टाकलेले प्लास्टिक आच्छादन, कुंडयांखालील ताट, कुलर्समधील पाणी अशा पाणी साचलेल्या ठिकाणी अंडी घालतो आणि डास उत्पत्ती होते. ही डास उत्पत्ती स्थाने होऊ न देण्याची काळजी घेणे व झाल्यास ती तात्काळ नष्ट करणे गरजेचे ठरते.

# १७ मे रोजी कल्याणमध्ये निलेश सांबरेंची विजय निर्धार सभा

## भिवंडीत १८ मे ला भव्य रोड शो आणि सभेचं आयोजन | वंचितचे प्रकाश आंबेडकर आणि आमदार बच्चू कडू लावणार प्रमुख उपस्थिती

कल्याण : जिजाऊ संघटना महाराष्ट्र अध्यक्ष आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी १७ मे रोजी कल्याणमध्ये भव्य विजय निर्धार सभा आयोजित केली आहे. ही सभा कल्याण पश्चिम मधील वासुदेव बळवंत फडके मैदान येथे संध्याकाळी पाच वाजता होणार आहे. या सभेला आमदार बच्चू कडू हे सुद्धा निलेश सांबरे यांचा प्रचार करण्यासाठी येणार असल्याची माहिती आयोजकांकडून मिळत आहे. बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेने निलेश सांबरे यांना भिवंडी लोकसभा मतदारसंघात जाहीर पाठींबा दिला आहे. तसेच प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी आणि अनेक कुणबी संघटना व बऱ्याच लहान मोठ्या पक्ष, संघटनांनीही निलेश सांबरे यांना लोकसभा नवडणुकीसाठी जाहीर पाठींबा दिला आहे.



त्याचप्रमाणे लोकसभा निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच १८ मे रोजी निलेश सांबरे भिवंडी शहरामध्ये एक भव्य रोड शो आणि प्रचार सभा घेणार असल्याचे असल्याचे जिजाऊ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडी पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे सुद्धा निलेश सांबरे यांचा प्रचार करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. भिवंडीतील रोड शो दुपारी १२ वाजता साईबाबा मंदिर बायपास, भिवंडी येथून सुरु होईल. त्यानंतर भादवड नका, नईबस्ती, कल्याण नाका, स्व. आनंद दिघे चौक, बस स्थानक, वंजारपट्टी नाका मार्गे दुपारी तीन वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, भिवंडी येथे पोहोचेल. रोड शो संपल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे




सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सभा आयोजित केली असून निलेश सांबरे उपस्थित नागरिक आणि कार्यकर्त्यांना संबोधित करतील. भिवंडी मतदार संघातील मविआ आणि महायुतीच्या उमेदवारांसाठी शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांनी अनुक्रमे १२ मे आणि १५ मे रोजी सभा घेतल्या. या सभांनंतर निलेश सांबरे हे त्यांच्या सभांमध्ये काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच या सभांनाही पूर्वी घेतलेल्या निर्धार सभांप्रमाणेच नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभेल असे निलेश सांबरे आणि जिजाऊच्या पदाधिकाऱ्यांचा विश्वास आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१